**महाराष्ट्र शासन**

# भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक

**(प्री-आयएएस ट्रेनिंग सेंटर)**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवार, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२ २२२.

UPSC (IAS/IPS/IFS) इत्यादी नागरी सेवा परीक्षाकरीता प्रशिक्षण

दुरध्वनी क्रमांक-०२५३-२२३०१०० वेबसाईट- www.iasnashik.org.in

केंद्रीय लोक सेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षा-२०१७ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता ११ महिने पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक प्रवेशासाठी **रविवार, दिनांक-२३.१०.२०१६** रोजी प्रवेश परीक्षा नाशिक येथे घेतली जाणार आहे.

**१.** प्रवेश क्षमताः एकुण ७०

१. भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक- ६०

२. अनुसूचित जाती BARTI व्दारा अनुदानीत- १०

**२.** प्रवेश परीक्षा पध्दत : प्रवेश पूर्व परीक्षा एकुण २०० गुणांची असेल, त्यात Section-I, सामान्य अध्ययन, १०० गुणांचा असेल व Section-II सीसॅट, १०० गुणांचा असेल, युपीएससी, नागरी सेवा परीक्षा २०१६ नुसार, गुणवत्ता यादी Section-I, सामान्य अध्ययन या भागातील गुणांवर आधारीत असेल, त्या करीता Section-II, सी सॅट या भागामध्ये किमान ३३ % गुण म्हणजेच ३३ गुण असणे अनिवार्य आहे.

तसेच नागरी सेवा परीक्षा-२०१६ च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल, प्रवेश परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल. प्रत्येक चुकीच्या उत्तराला मार्काच्या १/३ (०.३३ %) एवढे गुण कमी करण्यात येतील. परीक्षेची वेळ- सकाळी ११.०० ते १.०० (एकुण २ तास)

**३.** प्रवेश परीक्षा अर्हता :

अ. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परीक्षा उतीर्ण.

ब. वय मर्यादा : उमेदवाराचे वय ०१ ऑगस्ट, २०१७ रोजी-

(युपीएससी, नियमानुसार दिनांक ०२ ऑगस्ट, १९८५ च्या आधीचा जन्म नसावा व दिनांक ०१ ऑगस्ट, १९९६ नंतरचा जन्म नसावा.)

२१ ते ३२ वर्ष (खुला संवर्ग)

२१ ते ३५ वर्ष (इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./ भ.ज.)

२१ ते ३७ वर्ष (अनुसूचित जाती व जमाती)

क. उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी असला पाहिजे (Domicile of Maharashtra Certificate)

किंवा

शासन निर्णय क्र.रा.प्र.व्य.१०९८/(१७१/९८)/म.शि.-१ दिनांक २४.०४.२००० नुसार उमेदवार महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्यास त्याची / त्याच्या अर्जात तो / ती पात्रता परीक्षा महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील निर्देशित गाव किंवा शहरातील संस्थेमधून उतीर्ण झाल्याचे नमूद करणे आवश्यक असेल, तसेच अर्जासोबत संबधित विद्यार्थ्याचे / विद्यार्थीनीचे पालक महाराष्ट्र कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील रहिवासी असल्याचे असल्याचे जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र आणि विद्यार्थी पात्रता परीक्षा संस्थेतून झाल्याचे व त्याची / तिची मातृभाषा मराठी असल्याचे संस्थेच्या प्राचार्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच १० वी ची परीक्षा मराठी घेऊन उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

ड. प्रशिक्षण केंद्राच्या प्रारंभिक अथवा मुख्य परीक्षा प्रशिक्षण सत्राचा लाभ घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेस बसता येणार नाही.

इ. केंद्राच्या संपूर्ण प्रशिक्षण काळात उमेदवारास नोकरी अथवा इतर अभ्यासक्रमात सहभाग घेता येणार नाही.

फ. वैद्यकीय पदवी धारकांनी Intership पूर्ण करणे आवश्यक आहे.

**४. परीक्षेसंबधीत महत्वाची माहिती :**

**प्रवेश अर्ज ऑनलाईनवर भरण्याचे वेळापत्रक**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| ०१ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा कालावधी | २९.०८.२०१६ ते ३०.०९.२०१६ |
| ०२ | भारतीय स्टेट बॅकेच्या शाखेमध्ये विहीत चलनाव्दारे प्रवेश परीक्षा शुल्क जमा करण्याचा कालावधी | ३१.०८.२०१६ ते ०५.१०.२०१६ |
| ०३ | लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी | १०.१०.२०१६ ते २३.१०.२०१६ |

- प्रवेश अर्ज फी (चलनाव्दारे)- रु.३००/-खुला संवर्गाकरीता,
  रु.१५०/- अ.जा./अ.ज./वि.जा./भ.ज./इ.मा.व./वि.मा.प्र.
- www.iasnashik.org.in या वेबसाईटवर परीक्षेसंबंधी सर्व सुचना, माहितीपत्रक, अभ्यासक्रम उपलब्ध होईल. सदर माहिती पोस्टाने पाठविण्यात येणार नाही.
- प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज व कोणत्याही शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयात पाठविण्यात येऊ नयेत. प्रमाणपत्रे अंतिम निवड प्रक्रियेमध्ये तपासण्यात येतील.
- ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी www.iasnashik.org.in या संकेतस्थळावरील सुचना काळजीपूर्वक वाचून त्याप्रमाणे अर्ज भरण्यात यावा.

**५.** संस्थेतील मर्यादित वसतिगृह प्रवेश उपलब्धतेनुसार गुणवत्ता व प्रचलित नियमांच्याआधारे करण्यात येईल.

**६.** सूचना : प्रवेश परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांनी मोबाईल फोन, माहिती तंत्रज्ञान साधने व किमती वस्तू जवळ बाळगू नयेत.

**७.** प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका इंग्रजी भाषेतच असेल.

दिनांक : १९/०८/२०१६.

**(डॉ. विजय नारखेडे)**

**प्र. संचालक.**